क्र.मनपा/नसवि/२/विस/ ०३ /२०२०-२०२१
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २२ / ०३ / २०२१

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका विशेष सभा क्रमांक - ०३ /२०२०-२०२१

## महानगरपालिका विशेष सभेची नोटीस (ऑनलाईन अॅपद्वारे)

प्रति,
मा.........................................................................

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ड) (ह) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची विशेष सभा **शुक्रवार दि.२६/०३/२०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता** पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह, मुख्यालय सांगली येथे **मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन अॅपद्वारे आयोजित केली आहे.** या सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी आपण सदर सभेस ऑनलाईन सहभागी व्हावे हि विनंती.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी भागातील नागरिकांच्या समस्या / अडचणी सोडविणेसाठी गुंठेवारी समिती गठण करणेसाठी चर्चा करुन निर्णय घेणे.

२. सन २०१८ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर प्रभाग समिती क्र.१ ते ४ ची झालेली रचना त्या प्रभागातील नागरिकांच्या गैरसोईची आहे. तसेच, सदर प्रभाग समिती कार्यालये ही नागरिकांना गैरसोईचे असलेने महापालिका प्रभाग समितीच्या रचनेत फेरबदल करुन, प्रभाग समितीची पुर्नरचना करणेसाठी चर्चा करुन निर्णय घेणे.

**मा.महापौरसो यांचे आदेशाने** }

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

(**टिप** : मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दि.०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविलेनुसार सदरची सभा ऑनलाईन अॅपद्वारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रियेसंदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा.सदस्यांनी महापालिका सिस्टीम मॅनेजर यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.)

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- (विस) ०३** दिनांक :- २६/०३/२०२१

ठराव क्रमांक :- १२३

विषय क्रमांक :- ०१

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका दि.०९ फेब्रुवारी १९९८ रोजी अस्तित्वात आली. महाराष्ट्र शासनाने अविकसीत भागाचा विकास व्हावा यासाठी महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) अधिनियम २००१ अंमलात आणला आहे. सदर अधिनियमातील तरतुदी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेने लागू करुन घेवून महापालिका क्षेत्रातील गुंठेवारी विकास नियमाधीन करणेस वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे. महानगरपालिका अस्तित्वात येवून जवळ-जवळ २२ वर्षाचा कालावधी लोटला आहे. सदर कालावधीत महापालिका क्षेत्रामध्ये विस्तारीत भाग मोठ्या प्रमाणात झालेला असून, विस्तारीत भागातील नागरीकांच्या अडचणी सोडवून, त्यांना सोईसुविधा पुरविणेसाठी गुंठेवारी समितीची नियुक्ती करणे या सभेस उचित वाटते. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार खालील प्रमाणे गुंठेवारी समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मोहिते शेडजी सुबराव | १३. | सौ.साळूंखे शुभांगी महेश |
| २. | सौ.हुलवान मालन चंद्रकांत | १४. | श्री.पठाण फिरोज हुसेन |
| ३. | श्री.माने विष्णू आण्णासो | १५. | श्री.घाडगे विजय वसंत |
| ४. | श्री.सरगर मनगू केरु | १६. | सौ.नाईक नसीमा गैबीसो |
| ५. | श्री.थोरात योगेंद्र भगवान | १७. | श्री.देवमाने आनंदा मारुती |
| ६. | सौ.हारगे संगिता अभिजीत | १८. | श्री.ढंग प्रकाश बाबासो |
| ७. | सौ.केरीपाळे पवित्रा विजयकुमार | १९. | श्री.आवटी निरंजन सुरेश |
| ८. | सौ.नायकवडी वहिदा अय्याज | २०. | सौ.कल्लोळी गायत्री गजेंद्र |
| ९. | श्री.मेंढे संजय नायकू | २१. | सौ.कोळेकर कल्पना कल्लाप्पा |
| १०. | सौ.पाटील रोहिणी सत्यजीत | २२. | सौ.शेख नसीम सलीम |
| ११. | श्री.पाटील संतोष शिवदास | २३. | श्री.आलदर गजानन शिवाजी |
| १२. | श्रीमती कांबळे कांचन युवराज | २४. | श्री.कुलकर्णी संजय चंद्रकांत |

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

प.स.ठ.र.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सुचक :- श्री.विष्णू माने. ठराव बहुमताने मंजुर

D.P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री.उमेश पाटील. महापौर,

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- (विस) ०३** दिनांक :- २६/०३/२०२१

ठराव क्रमांक :- १२४

विषय क्रमांक :- ०२

---

सांगली मिरज आणि कुपवाड या तिन्ही नगरपरिषदांची मिळून सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका सन १९९८ मध्ये अस्तित्वात आली असून, महानगरपालिकेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी लागू आहेत. त्यानुसार महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर प्रथमपासून कलम २९-अ अन्वये प्रभाग समित्यांचे गठण करण्यात येवून, अधिनियमातील तरतुदीनुसार कामकाज चालविले जात आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची पाचवी सार्वत्रिक निवडणूक २०१८ पार पडल्यानंतर मा.महासभा ठराव क्र.५२ दि.१०/०९/२०१८ अन्वये खालील प्रमाणे प्रभाग समिती गठीत करणेत आलेल्या होत्या.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती क्रमांक - एक | ११,१२,१३,१४,१६ |
| २. | प्रभाग समिती क्रमांक - दोन | १०,१५,१७,१८,१९ |
| ३. | प्रभाग समिती क्रमांक - तीन | १,२,८,९ |
| ४. | प्रभाग समिती क्रमांक - चार | ३,४,५,६,७,२० |

वरील गठीत करणेत आलेल्या प्रभाग समिती क्र.१ ते ४ मध्ये झालेली रचना त्या प्रभागातील नागरिकांच्या गैरसोईची असलेने तसेच, सदर प्रभाग समिती कार्यालये ही नागरिकांना गैरसोईची असलेने प्रभाग समिती क्र.१ ते ४ ची खालील प्रमाणे पुर्नरचना करणेस ही सभा मान्यता देत आहे.

| अ.क्र. | प्रभाग समिती क्रमांक | प्रभाग क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रभाग समिती क्रमांक - एक | ९,१०,११,१२,१३ |
| २. | प्रभाग समिती क्रमांक - दोन | १४,१५,१६,१७,१८, |
| ३. | प्रभाग समिती क्रमांक - तीन | १,२,३,८,१९ |
| ४. | प्रभाग समिती क्रमांक - चार | ४,५,६,७,२० |

वरील प्रमाणे प्रशासनाने नोंद घेवून, पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेत यावी असे ही सभा आदेशित करीत आहे.

स्था. आयुक्त
प्र.स. क्र. १२४

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचक :- श्री. विष्णू माने. ठराव बहुमताने मंजुर

D. P. Suryavanshi

अनुमोदक :- श्री. खारवळकर उत्तम बाळकृष्णा. महापौर,